# जिल्ह्यात सुमारे २०० बिबटे : आत्रेय

अकोले, दि. १६ (प्रतिनिधी) - अकोले ते श्रीरामपूर तालुका या प्रवरा पट्ट्यात ऊसशेतीच्या आश्रयाने बिबटे चांगलेच स्थिरावले आहेत. ही संख्या २००च्या आसपास आहे, असा अंदाज आहे. बिबट्या व मानवाचा संघर्ष कमी करायचा असेल, तर बिबट्याला सहज उपलब्ध होणारे डुकरे, कुत्री असे खाद्य मिळणार नाही, याकडे लक्ष द्यायला हवे, असा सल्ला विद्या आत्रेय यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला.



तालुक्यातील प्रवरा पट्ट्यातील बिबट्यांची संख्या निश्चित करण्यासाठी बंगलोर येथील नॅशनल सेंटर फॉर सायन्सच्या सहकार्याने आत्रेय निरीक्षक म्हणून गत तीन वर्षांपासून संशोधन करीत आहेत. अकोल्यासह प्रवरा हरित पट्ट्यातील ऊस क्षेत्रातील गावे पिंजून काढत त्यांनी हे काम हाती घेतले आहे. 'कॅमेरा ट्रॅपिंग' व 'डीएनए' अशा दोन तंत्रांचा अवलंब करत आत्रेय बिबट्या जीवाविषयी संशोधन करत नोंदी घेत आहेत.

आत्रेय म्हणाल्या, प्रवरेच्या हरितपट्ट्यात ऊस शेतीच्या आश्रयाने कुत्री, डुकरे, शेळ्या, मेंढ्या हे खाद्य सहज उपलब्ध होत असल्याने या भागातील बिबटे भटकंती करणाऱ्या जंगली बिबट्यांपेक्षा सुस्त झाले आहेत. ज्या बिबट्यांचा जन्मच प्रवरा ऊस क्षेत्रात झाला. त्यांना पकडून दूर जंगलात सोडले, तर शिकारीचे चांगले कौशल्य प्राप्त न केल्याने हे बिबटे उपाशी राहून गतप्राण होऊ शकतात. पकडून दूर सोडलेले बिबटे पुन्हा त्याच ठिकाणी १०० किलोमीटरवरूनही येतात, अशा नोंदी आत्रेय यांनी दाखविल्या. सोडलेले बिबटे माणसावरही चवताळल्याने हल्ले करण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. बिबटे माणसाला खूप घाबरतात. मात्र, बिबट्या घाबरेल, अशा हालचाली माणसांकडून झाल्या, तर घाबरून प्रतिहल्ला करण्यास त्याला भाग पडते. बिबट्यांकडून ठार झालेल्या पाळीव प्राण्याची भरपाई पशुधन मालकाला तात्काळ मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बिबट्याच्या विष्ठेवरून आत्रेय यांनी त्यांच्या खाद्याबाबत अनुमान काढले. त्यांच्या खाद्यामध्ये ६० टक्के डुक्कर व कुत्री, ३९ टक्के हिस्सा शेळ्या व मेंढ्याचा आहे, तर मुंगुस, घूस, उदमांजर या जंगली जनावरांचे प्रमाण अवघा एक टक्का असल्याची माहिती दिली. अकोले शहरात तब्बल ३ हजारांच्या आसपास डुकरे व १५० हून अधिक मोकाट कुत्री असल्याचे संशोधनही आत्रेय त्यांनी केले असून, शहराला लागून असलेल्या ऊस शेतात यामुळे बिबटे स्थिरावले आहेत.